# " तंत्रशिक्षण व रोजगाराच्या मोठ्या संधी - येणाऱ्या काळाची चाहूल"

कुठलाही वस्तीतल्या घरातून, ", अरे चांगलं शिक, उत्तम नोकरी मिळव, कमावता हो आणि आपली परिस्थिती बदल" असे वाक्य आई वडील किंवा नातेवाईक यांच्या तोंडून सहज ऐकायला मिळतात. आणि ही गोष्ट खरी आहे की चांगलं शिक्षण जर माणसाजवळ असेल तर आपली परिस्थिती बदलायचा मार्ग त्याला नक्कीच गवसतो. शिक्षणाच म्हटलं तर बारावीपर्यंत शिक्षण हे एका सुरात चालतं पण त्यानंतर खरा आयुष्याचा टर्निंग पॉईंट येतो आणि उच्चशिक्षण घेण्याकरता विविध दालन हे विद्यार्थ्यांकरता उपलब्ध होतात अशाच विविध दालनात व ज्याची आज देशाला खऱ्या अर्थाने गरज आहे असे एक दालन म्हणजे अभियांत्रिकी व तंत्रज्ञानाचे दालन. यातून विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाचे शिक्षण मिळून विद्यार्थी हे तंत्रज्ञानाच्या जगतात उंच भरारी घेऊ शकतात. अभियांत्रिकी तंत्रज्ञान शिक्षण देणाऱ्या संस्थानचा जर विचार केला तर ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन(A.I.C.T.E.) द्वारे मान्यताप्राप्त देशभरात  शासकीय व अशासकीय असे 3000 पेक्षा अधिक महाविद्यालय कार्यरत आहेत व दरवर्षी या महाविद्यालयांमधून 15 लाखाहून अधिक विद्यार्थी हे तंत्र शिक्षणाची पदवी घेऊन बाहेर पडत आहेत. महाराष्ट्र राज्याचा जर विचार केला तर जवळपास400 महाविद्यालय हे तंत्रज्ञानाचे शिक्षण देत आहेत आणि दीड लाखाहून अधिक विद्यार्थी हे तंत्रज्ञान पदवी घेऊन उत्तीर्ण होत आहेत.

या तंत्रशिक्षणात जो महत्त्वाचा त्रिकोण तयार होतो आहे तो म्हणजे "परीक्षा -पदवी- नोकरी" असा आहे, त्यामुळे चांगल्या मेहनतीने परीक्षा देणे उत्तम गुणांनी पदवी मिळवणे व त्या आधारावर सर्वोत्तम नोकरी मिळवणे हे विद्यार्थ्यांच्या यशाचे गुणसूत्र राहू शकते. पण या गोष्टींचा आपण जर खोलवर विचार केला तर असे लक्षात येते की परीक्षा देणे व उत्तम गुणांची पदवी मिळवणे तितकेसे अवघड नाही पण अवघड आहे ते ज्या क्षेत्रातील पदवी आहे त्या क्षेत्रात सर्वोत्तम नोकरी मिळवणे, पण ठरवले तर हेही तितके कठीण नाही करण नियमित अभ्यासासोबत थोडी अधिक मेहनत घेतली तर हे सहज शक्य होऊ शकेल, यात विद्यार्थ्यांनी आपल्या नियमित अभ्यासासोबत आज उद्योग क्षेत्राला गुणपत्रिका व पदवी सोबत ज्या कौशल्यांची आवश्यकता आहे ते कौशल्य जर अंगिकारलं तर या उद्योग क्षेत्रात सहज नोकरी मिळू शकेल.

मी स्वतः गेल्या सतरा वर्षांपासून प्रशिक्षण व आस्थापना अधिकारी म्हणून कार्यरत आहे, या सतरा वर्षात या उद्योग जगतातले अनेक उतार-चढाव अनुभवायला मिळाले. त्यात2003 सालची तसेच 2008 सालची उद्योग क्षेत्रातील मंदी अनुभवली. पण एक गोष्ट लक्षात आली की आपल्याजवळ जर कौशल्य युक्त बुद्धिमत्ता असेल ज्याला आपण इंग्रजीत SKILL BASED TALENT असे म्हणतो, हे जर आपल्या जवळ असेल तर

तुम्हाला कोणीही थांबवू शकत नाही, इंग्रजीत म्हटल्याप्रमाणे" You Will Become Unstoppable", आणि शंभर टक्के तुम्हाला तुमच्या लायक नोकरी मिळेलच.

या उद्योग जगताचे मोठ्या स्तरावर आपण जर वर्गीकरण केले तर हे जगत साधारणतः, माहिती व तंत्रज्ञान(Information Technology), ज्याला प्रचलित शब्दात आयटी इंडस्ट्री असे म्हणतात, तसेच आयटी आधारित सर्विसेस(I.T.E.S.), व कोअर सेक्टर असे वर्गीकरण होते. यात अभियांत्रिकी व तंत्रज्ञान शिक्षणात विविध शाखा व त्या आधारित नोकरी दृष्टीने उपलब्ध असलेल्या वरील वर्गीकृत केलेले उद्योग जगतातील क्षेत्र यांचा समन्वय साधला तर कम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी व इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजीनियरिंग या शाखेच्या विद्यार्थ्यांकरिता आयटी इंडस्ट्री तसेच आयटी आधारित विविध सर्विस इंडस्ट्री या क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर नोकऱ्या उपलब्ध आहेत, तसेच कोअर सेक्टर चा विचार केला तर इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजीनियरिंग, इलेक्ट्रिकल इंजीनियरिंग, मेकॅनिकल इंजिनियरिंग, सिव्हिल इंजिनिअरिंग, प्रोडक्शन इंजीनियरिंग सारख्या शाखेच्या विद्यार्थ्यांकरता या कोअर सेक्टर या क्षेत्रात नोकरीची संधी आहे. बऱ्याच वेळा माहितीच्या अभावी या क्षेत्रात जास्त नोकरी आहेत आणि दुसऱ्या क्षेत्रात नाहीत अशा पद्धतीची चर्चा विशेषता पालकांमध्ये ऐकायला मिळते. एक तीन वर्षांपूर्वीचा विचार या अनुषंगाने केला तर काही प्रमाणात ते खरं होतं पण गेल्या दोन वर्षापासून चित्र बदललंय व तंत्रज्ञानाच्या प्रत्येक क्षेत्रात इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांकरिता मोठ्या प्रमाणात नोकऱ्यांची संधी उपलब्ध आहेत. Randstand ही उद्योग जगतात मोठ्या प्रमाणावर नोकरीची संधी उपलब्ध करून देणारी जगातील एक मोठी फर्म आहे, यांच्या म्हणण्याप्रमाणे भारतातील उद्योग जगतामध्ये 2019 मध्ये मोठ्या प्रमाणात वाढ दिसून आली आहे, या करिता जी कारणे त्यांनी नमूद केली आहेत त्यातील काही कारणे म्हणजे भारतातील सकल घरेलू उत्पाद(G.D.P.) मधील स्थिर वृद्धि(STEADY GROWTH), स्वयंरोजगार क्षेत्रात आलेली सुलभता, व त्यादृष्टीने भारताचं उंचावलेले रँकिंग, तसेच आयटी इंडस्ट्री मध्ये नोकरी भरती करता केलेले सुधारित बदल हे कारणीभूत आहेत. आणि खरोखर व्यावहारिक दृष्ट्या जर पाहिलं तर माझ्या अनुभवाप्रमाणे गेल्या अनेक वर्षापासून अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यां साठी केम्पस इंटरव्यू करिता मला कंपन्यांचा खूप पाठपुरावा करावा लागायचा, पण या वर्षीचा अनुभव काही सुखद आहे ज्यामध्ये बऱ्याच कंपन्यांचे मला केम्पस इंटरव्यू करिता फोन, मेल आले. तसेच बऱ्याच मोठ्या कंपन्यांनी नॅशनल टॅलेंट हंट सारख्या कॉम्पिटिशन मधून मुलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. जी इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांकरता एक मोठी व चांगली बाब आहे.

Randstand यांनी म्हटल्याप्रमाणे येणाऱ्या काळात आयटी, इन्फ्रास्ट्रक्चर अँड कंस्ट्रक्शन, मॅन्युफॅक्चरिंग, रिटेल, बँकिंग फायनान्शिअल सर्विसेस अंड इन्शुरन्स(BFSI), फास्ट मुविंग कन्सुमर गुड्स(FMCG) हे सर्व

भारतातील अर्थव्यवस्था अधिक गतीने पुढे नेण्याकरता कारणीभूत ठरणार आहेत व त्या अनुषंगाने या क्षेत्रातील सर्व मोठ्या कंपन्यांमध्ये मोठ्या प्रमाणात मॅनपावर ची आवश्यकता भासणार आहे,. तसेच शासनाच्या स्मॉल इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट बँक आणि पाच पब्लिक सेक्टर बँक यांच्या माध्यमातून 59 मिनिटात एक करोड पर्यंत लोनची सुविधा जी उपलब्ध करून दिली आहे त्यामुळे मायक्रो, स्मॉल अँड मिडीयम एंटरप्राइजेस(M.S.M.E.) मध्ये मोठ्या प्रमाणात क्रांती होणार होणार आहे व त्यामुळे छोट्या कंपन्यांमध्ये देखील चांगल्या रोजगारांच्या संधी या इंजिनिअरिंग क्षेत्रातील विद्यार्थ्यांकरिता उपलब्ध होणार आहेत.

यासोबत अभियांत्रिकीचे शिक्षण घेत असतानाच जपानी, फ्रेंच, जर्मन इत्यादी सारख्या भाषा जर एखाद्या विशिष्ट लेव्हल पर्यंत विद्यार्थ्यांनी शिकल्या त्याच्या परीक्षा देऊन उत्तीर्ण केल्या तर वरील नमूद केलेल्या देशांमध्ये चांगल्या पगाराच्या नोकऱ्या देखील उपलब्ध आहेत. उदाहरण घ्यायचे झाल्यास जपानी भाषेची N4 किंवा N3 स्तराची JLPT परीक्षा जर इंजिनीअरिंगच्या विद्यार्थ्यांनी पास केली तर जपानमध्ये त्या विद्यार्थ्यांना वार्षिक 18 लाख ते 24 लाख पॅकेज ची नोकरी मिळू शकते. तसेच विद्यार्थ्यांना भारतात नोकरी करायची असल्यास भारतातील जपानी कंपन्यांमध्ये त्यांना ती संधी मिळू शकते.

वरील सर्व बाबींचा जर आपण लेखाजोखा घेतला तर आपल्या लक्षात येते की येणाऱ्या काळात इंजिनिअरिंगच्या सर्व शाखेतील विद्यार्थ्यांकरता नोकरीच्या क्षेत्रातील एक मोठा कॅनव्हास त्यांच्या करियर करता उपलब्ध आहे आवश्यकता आहे ती फक्त विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या शाखेची निवड करून त्यात अहोरात्र मेहनत करून, नियमित अभ्यासाव्यतिरिक्त ज्याला आपण इंडस्ट्री रिक्वायर्ड स्किल Based टॅलेंट अंगीकारून यश संपादित करायचे आहे. आणि या कॉर्पोरेट जगतात काम करायची पद्धत आहे त्याप्रमाणे मी म्हणेन की या इंडस्ट्रीत " You have to Enter Like Bull, Work Like Horse And Emerge Like Lion " हे सूत्र नक्कीच उपयोगात येईल.

प्रा. स्वप्निल वि. पोतदार (9226338702)
अध्यक्ष, इंजिनिअरिंग कॉलेज प्लेसमेंट असोसिएशन अमरावती चॅप्टर
सिनेट सदस्य( राज्यपाल नामांकित), संत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर